# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.१०४०१/२१/अ.क्र.५८०८/२४**

श्री.पुरुषोत्तम विठोबा वर्तक

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (का.) बृ.मुं.म.पा. शिक्षण विभाग
शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय, त्रिवेणी संगम मनपा शाळा इमारत,
पालव मार्ग, करी रोड (पू.), मुंबई-४०० ०१२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (मध्यवर्ती) बृ.मुं.म.पा. शिक्षण विभाग
शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय, त्रिवेणी संगम मनपा शाळा इमारत,
पालव मार्ग, करी रोड (पू.), मुंबई-४०० ०१२.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७-११-२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०-०५-२०२१ | २१-०५-२०२१<br>०१-०६-२०२१<br>०३-०६-२०२१<br>३०-०६-२०२१<br>०५-११-२०२४ | १५-०७-२०२१ | १७-०८-२०२१ |

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.२०-०५-२०२१ नुसार शिक्षणाधिकारी यांचा आदेश क्र.EOE/OD/९२६१ दि.१७-०३-२००८ शी संबंधित एकूण ४ मुद्यांची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (चार) यांनी दि.२१-०५-२०२१ अन्वये अपिलकर्तांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) नुसार त्यांचा अर्ज प्रशासकीय अधिकारी (इओए उपविभाग) यांचेकडे हस्तांतरीत केला आहे असे उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (पाच) यांनी दि.०१-०६-२०२१ अन्वये अपिलकर्तांनी मागणी केल्यानुसार माहिती सादर करण्यात येईल व काही माहिती प्रशासकीय अधिकारी

(इओआर) प्रशासकीय अधिकारी (इओबी) यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात यावी असे उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (का.) यांनी दि.०३-०६-२०२१ अन्वये अपिलकर्तांनी मागणी केलेली माहिती प्रशासकीय अधिकारी (शाळा) जी/दक्षिण यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (का.) यांनी दि.३०-०६-२०२१ अन्वये काही माहिती या कार्यालयाच्या उपलब्ध असलेल्या अभिलेखामध्ये शोधण्यासाठी कालावधी लागणार असल्याने अल्प कालावधीत माहिती देण्यात येईल असे उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा) जी/दक्षिण विभाग यांनी दि.२३-०७-२०२१ अन्वये अपिलकर्तांनी रकाना क्र.१ व २ बाबतची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने माहिती अधिकार अधिनियमांतर्गत देणे शक्य नाही असे उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी शिक्षण विभाग यांनी दि.०५-११-२०२४ अन्वये अपिलकर्तांनी मागणी केलेल्या सर्व मुद्यांबाबत माहिती पाठवून उत्तर दिले.

तथापि, अपिलकर्तांचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज सादर केला.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मध्यवर्ती) शिक्षण विभाग यांनी दिनांक १७-०८-२०२१ अन्वये जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलकर्तास ८ दिवसात विनाशुल्क माहिती देण्यात यावी असे आदेश पारित केले.

अपिलकर्तांनी आयोगाकडे दि.२७-०८-२०२१ नुसार जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इओआर व इओबी) आणि प्रथम अपिलीय अधिकारी उपशिक्षणाधिकारी (मध्यवर्ती) उपस्थित.

सुनावणीच्या वेळी अपिलकर्तांनी विशद केले की, त्यांना मुद्दा क्र.अ पैकी काही माहिती मिळाली आहे व मुद्दा क्र. ब, क व ड ची माहिती अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगास सादर केले की, मूळ माहिती अर्जातील मुद्दे क्र.ब, क व ड फारसे स्पष्ट नाहीत. सुनावणी दरम्यान अपिलकर्तांनी स्पष्ट केले की त्यांना दि. १७-०३-२००८ रोजी झालेली जेष्ठ मुख्याध्यापक पदावरुन वरिष्ठ पदावर झालेल्या पदोन्नती मिटींगचे इतिवृत्तची (Meeting Minutes) माहिती हवी आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी सदर माहिती अपिलकर्तास उपलब्ध करुन देणेस मान्य केले परंतु, कर्मचाऱ्यांची निवडणूकी विषयी जबाबदारी लक्षात घेता काही वेळेची मागणी केली.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दि.३०-११-२०२४ पूर्वी अपिलकर्तांना सदर पदोन्नती मिटींगचे इतिवृत्तची (Meeting Minutes) बाबतची माहिती नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Maharashtra

7-11-2024

( डॉ.प्रदीप व्यास )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-११-२०२४